*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

***NAVJYOT / Vol. XII / Issue - II*** ***ISSN 2277- 8063***

# जयप्रकाश नारायण यांच्या लोकशाही विचारांची समकालीन प्रस्तुतता व मर्यादा

**प्रा. पाटील प्रमोद जगन्नाथ,** राज्यशास्त्र विभाग,

माऊली महाविद्यालय, वडाळा ता.उत्तर सोलापूर जिल्हा- सोलापूर, pramod24patil@gmail.com

---

**प्रस्तावना-**

राजकीय संकल्पना या मानवाच्या विकासाच्या प्रत्येक टप्प्यावरती क्रमाक्रमाने विकसित होणाऱ्या संकल्पना असतात. या संकल्पना वर्तमानात समजून घेऊन भविष्यकाळ घडवण्यामध्ये अधिक मानवी जीवन उज्वल करण्यामध्ये योगदान देत असतात. यामधील सर्वात महत्त्वाची संकल्पना म्हणजे लोकशाही. लोकशाही संकल्पनेच्या विकासामध्ये अनेक विचारवंतांनी तत्ववेत्यांनी योगदान दिले आहे. भारतीय इतिहास संशोधकांच्या मते, प्राचीन भारतात इ.स.पूर्व 700 इतक्या जुन्या काळात लोकशाहीचे जुने रूप गणतंत्र म्हणून आढळते. लिच्छवीं सारख्या राज्यामध्ये गणतंत्र पद्धत आढळते. युरोपच्या इतिहासात संशोधकांनी जुन्या अथेंन्स राज्यात लोकशाही संकल्पना नोंदवली आहे. तसेच पाश्चात्य लोकशाहीमध्ये देखील लोकशाहीचा उगम इ.स.पूर्व 700 दिसून येतो. थोडक्यात पाश्चात्य व पौर्वात्य देशांमध्ये लोकशाही संकल्पना कमी अधिक फरकाने एकाच वेळेस विकसित व्हायला सुरुवात झालेली दिसतात.

प्राचीन भारतीय लोकशाही परंपरा गुप्तांच्या काळापासून म्हणजे इसवी सन पाचव्या शतकापासून पुढे इसवी सन 1947 पर्यंत म्हणजेच विसाव्या शतकापर्यंत भारतात लोकशाही दिसत नाही. पाश्चात्य विचारांमध्ये लोकशाहीच्या संदर्भात जॉन लॉक, जे.एस.मिल, या विचारवंतांनी योगदान दिले आहे. भारतीय परंपरेमध्ये गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विनोबा भावे, जयप्रकाश नारायण या विचारवंतांनी लोकशाही विचारांच्या संदर्भात योगदान दिले आहे. गांधींनी लोकशाहीच्या संदर्भात मांडणी करताना, शास्त्रीय पद्धतीने केलेली नसली तरी, गांधींनी लोकशाहीचे चिंतन व्यापक प्रमाणात केले आहे. तत्कालीन लोकशाहीच्या संदर्भात चिंतन करणाऱ्या विचारवंतांच्या पुढे सामान्य मजूर, कामगार, शेतकरी यांचे प्रश्न फारसे डोळ्यासमोर नव्हते. गांधींच्या मात्र लोकशाही विचारांमध्ये ग्रामीण भाग हा चिंतनाचा प्रधान विषय होता. संघटित दरिद्री, अशिक्षित आणि मागासलेले यांना विकसित अग्रहक्क हवा. स्वातंत्र्याची गरज खरी त्यांनाच असते अशी त्यांची भूमिका होती. गांधींच्या लोकशाही चिंतनातून प्रामुख्याने स्वातंत्र्य कुनासाठी हा महत्त्वाचा मुद्दा निर्माण होतो. त्याचबरोबर कायदेशीर शासन पद्धतीमध्ये राज्यसंस्थेविरुद्ध लढण्याचा मार्ग सत्याग्रह चिंतनातून गांधी दाखवतात. त्याचबरोबर बहुमत शासन पद्धतीला गांधीविरोध करतात. महात्मा गांधींना अभिप्रेत असलेल्या विकेंद्रीत, ग्रामराज्य प्रधान लोकशाही संकल्पनेला घटनाकारांनी नाकारल्याने पाश्चात्त्य देशांच्या राज्यघटनेवर आधारित संसदीय लोकशाहीपद्धत स्वीकारण्यात आली. संसदीय लोकशाहीच्या व्यवस्थेतील दोष प्रामुख्याने इंदिरा गांधीजींच्या कालखंडामध्ये पुढे आले. प्रतिनिधी लोकशाहीतील दोषांच्या संदर्भात मूलभूत चिंतन तसेच नवा मार्ग जयप्रकाश नारायण यांनी दाखवला. सदर संशोधन पेपर मध्ये प्रतिनिधी लोकशाही शासनपद्धतीतील दोष, त्यासंदर्भात जयप्रकाश नारायण यांची भूमिका, पर्यायी मार्ग व सद्यकालीन प्रतिनिधी शासनपद्धती निराकारणास जयप्रकाश नारायण यांनी दाखवलेला मार्ग व मर्यादा यासंदर्भात चर्चा करण्यात आली आहे.

**गृहीतके-**

१) जयप्रकाश नारायण यांनी प्रातिनिधिक लोकशाही मधील दोष स्पष्ट केले.

२) जयप्रकाश नारायण यांनी प्रतिनिधी लोकशाहीतील दोष दूर करण्याचा प्रयत्न केला.

३) जयप्रकाश नारायण यांनी प्रतिनिधी लोकशाहीमध्ये सुधारणा करण्यासाठी सहभागात्मक लोकशाहीचा, संपूर्ण क्रांतीचा मार्ग भारतीयांना दाखवला.

४) जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांतीच्या लढ्यामुळे प्रतिनिधिक लोकशाहीमध्ये नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने विविध उपाय समोर आले.

५) जयप्रकाश नारायण यांनी गांधीजींना अपेक्षित असलेल्या लोकशाही विचारांचा विस्तार केला.

**उद्दिष्ट्ये-**

१) जयप्रकाश नारायण यांनी सहभागात्मक लोकशाही विषयी केलेल्या मांडणीचा अभ्यास करणे.

२) जयप्रकाश नारायण यांनी भारतीय प्रातिनिधिक लोकशाही सुधारणेच्या दृष्टिकोनातून योगदान दिले. ते अभ्यासणे.

३) जयप्रकाश नारायण यांनी प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या दृष्टिकोनातून मांडलेल्या संपूर्ण क्रांतीचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती –**

प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये ऐतिहासिक व ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा वापर संशोधकाकडून केला जाणार आहे. ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथांचा तसेच प्रकाशित, अप्रकाशित प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनांच्या आधार सदर संशोधन पेपरसाठी घेतला जाणार आहे.

**विषय विश्लेषण –**

लोकशाहीच्या संकल्पनेचा प्राण म्हणजे व्यक्तीस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य नसेल तर लोक निर्भय नसतात आणि त्या समाजात शासकीय चौकट तथाकथित लोकशाही असूनही प्रत्यक्षात त्या समाजात लोकशाही नसते. व्यक्तीस्वातंत्र्य संकल्पना ही प्रत्येक व्यक्ती समान आहे, प्रत्येक व्यक्तीचे मूल्य समान आहेत. प्रत्येक व्यक्तीला बुद्धी, इच्छा, आकांक्षा आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घेण्यासाठी सर्व संधी उपलब्ध असल्या पाहिजेत, या धारणेवर व्यक्तीस्वातंत्र्य उभे असते. त्याठिकाणी व्यक्तीस्वातंत्र्य नसते आणि लोकशाही ही नसते. व्यक्ती हा मूळ घटक किंवा एकच ही मान्यता ज्या समाजात असते तेथे लोकशाही राहू शकते. कुटुंब, जात, धर्म, वंश, वर्ण यांच्या आधारे ज्या ठिकाणी व्यक्ती समूह पद्धतीने मोजल्या जातात. तेथे लोकशाही नावाला असते.

लोकशाही व्यवस्थेतील शासन प्रशासन लोकशाही व्यवस्था तिच्या अपेक्षित लाभ समाजातील प्रत्येकापर्यंत पोहोचणे ही अशक्यप्राय गोष्ट आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये समाजातील प्रत्येक घटकाच्या वाढलेल्या अपेक्षा व त्यामध्ये आलेले अपयश यामुळे प्रातिनिधिक लोकशाही बद्दल नागरिकांच्या मधील निरुत्साह मोठ्या प्रमाणात वाढू लागला. त्यातील दोष प्रामुख्याने चर्चिले जाऊ लागले. घटनात्मक मूल्य व प्रत्यक्ष व्यवहार यामधील अंतरामुळे प्रतिनिधिक लोकशाही बद्दल लोकांच्या मनामध्ये निरुत्साह निर्माण झाला. बहुमताच्या आधारे सत्ताप्राप्ती करण्यासाठी कोणत्याही वाम मार्गाचा वापर, अनिष्ट व अनैतिक अशा मार्गांचा वापर करून सत्ता प्राप्त करणे. अनैतिक मार्गाने धनसंचय करणे व त्या धनसंचयाच्या आधारे पुन्हा सत्ता प्राप्त करणे. सत्ता, सर्व यंत्रणा स्वस्वार्थासाठी किंवा स्वकीय समूहासाठी वापरणे यामध्ये भारतीय लोकशाही गुरफटलेली आपणास दिसते. त्यामुळेच 'बहुमत प्रतिनिधिक' लोकशाहीमध्ये बहुसंख्य लोकांना लोकशाही पासून लोक दूर ठेवले जाते. प्रत्यक्ष लाभाचे लाभार्थी बनण्यापासून त्यांना रोखून ठेवण्यात येते. प्रत्यक्षात सत्तेच्या लाभातून संपत्तीचा संचय, वाटा, मूठभर यांच्याच वाट्याला कसा जाईल. त्या वाट्यातून सत्ता केंद्र आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. त्यातून पुन्हा लाभाचा वाटा, निर्मिती व सत्ताप्राप्ती असे दुष्टचक्र भारतीय लोकशाहीचे निर्माण झाले आहे.

या साऱ्यांचा परिणाम म्हणून निर्वाचित लोकशाही व लोकप्रतिनिधी यांच्यावरील सातत्यपूर्ण नियंत्रणाचे जे उपाय आहेत त्या उपायांचा शोध घेण्यात येऊ लागला व त्या संदर्भात मांडणी करण्यात येऊ लागली. यासंदर्भात प्रामुख्याने जयप्रकाश नारायण यांनी संपूर्ण क्रांतीच्या आधारे 'पार्टिसिपेटिव्ह डेमोक्रसी' 'सहभागात्मक लोकशाही'ची मांडणी केली. त्यांची भूमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**जयप्रकाश नारायण यांचे लोकशाहीसंबंधी विचार :**

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये भारतीयांच्या वाढलेल्या आकांक्षा, राजकीय सत्तेकडून असलेल्या अपेक्षा व प्रत्यक्ष व्यवहार यामुळे जयप्रकाश नारायण यासारख्यांचा देशातील लोकशाही राजकीय क्षेत्राच्या कामकाजाने भ्रमनिरास झाला. जयप्रकाश नारायण यांनी विविध पाश्चात्त्य देशांचा प्रवास केला. या पाश्चात्य देशांच्या प्रवासामध्ये त्या त्या देशातील सरकारांची घडण आणि कार्यपद्धती समजून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या देशातील राजकीय

परिस्थितीचा अभ्यास केल्यानंतर जयप्रकाश नारायण यांना असे लक्षात आले की, सत्तेचे वरच्या पातळीवर केंद्रीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. जयप्रकाश नारायण यांच्या मते, लोकशाहीमध्ये सत्ता लोकांच्या हाती असणे आवश्यक आहे. लोकांच्या हाती सत्ता कशा पद्धतीने राहील यादृष्टीने जयप्रकाश नारायण यांनी भारतीय राजकीय पद्धतीची पुनर्बांधणी करण्याच्या दृष्टीने व त्यांच्या कल्पनांना मूर्त देण्यासाठी त्यांनी १९५९ मध्ये 'भारतीय राजकीय क्षेत्राच्या पुनर्बांधणीचे आवाहन' (A plea for the reconstruction Indian polity) हे पुस्तक प्रसिद्ध केले.

१ समुदायाधारित लोकशाही (Communitarian Democracy) व सहभागी लोकशाही (Participatory Democracy) यातील राजकीय प्रक्रिया –

जयप्रकाश नारायण यांच्या मते, भारतीय राजकारण हे क्षेत्राच्या पुनर्बांधणी आधारावर झाली पाहिजेत, त्या आधारे विकेंद्रीत विकास साधला पाहिजे. जयप्रकाश नारायण यांना समुदायाधारित लोकशाही व सहभागी लोकशाही यातील राजकीय प्रक्रिया अपेक्षित होती. समुदायाधारित लोकशाहीतील राजकीय प्रक्रिया ही संसदीय लोकशाही प्रकारातील प्रक्रियेपेक्षा वेगळी आहे. समुदायाधारित लोकशाहीचा गाभा सहकार आणि सहानुभूती आहे. म्हणून या पद्धतीत सुसंवाद पद्धतीने राजकीय निर्णयप्रक्रिया अवलंबली पाहिजे, त्यामुळे समाजाच्या सर्व हितसंबंधांना वाव मिळतो. थोडक्यात जयप्रकाश नारायण यांचा लोकशाही संबंधी भर हा नैतिक व समाजशास्त्रीय एकात्म लोकशाहीवर होता.

**२ लोकशाहीमध्ये नैतिकता-**

जयप्रकाश नारायण यांच्या मते, लोकशाहीमध्ये नैतिकता असली पाहिजे नैतिकता नसेल, तर लोकशाहीची अवस्था काय? असा प्रश्न ते उपस्थित करतात लोकशाहीचे संरक्षण करण्यासाठी निपक्षपाती तरुणांनी शुद्ध स्वतंत्र वातावरणात निवडणुका कशा होतील हे पाहिले पाहिजे. खोटे मतदान एखाद्या ठिकाणी चालले असेल तर तरुणांनी शांततामय घेराव घातला पाहिजे. विशुद्ध मतदान होईपर्यंत तिथून हटता उपयोगी नाही गरज पडली तर, अशा ठिकाणची निवडणूक रद्द करायला लावण्याची तयारी केली पाहिजे. जयप्रकाश नारायण यांचे क्रांतीचे स्वरूप वेगळे होते. भ्रष्टाचारमय व अनैतिक लोकशाहीचा अंधारात भारतीय जनतेला नवा मार्ग दाखवण्याचे कार्य जयप्रकाश नारायण यांनी केले.

मूलभूत समानतेवर दृढ विश्वास, जबाबदारी स्वीकारण्याची तयारी, मानवी स्वभाव हा शिक्षणक्षम आहे. यावर जयप्रकाश नारायण यांचा अढळ विश्वास होता. जयप्रकाश नारायण यांच्या मते, आजच्या भौतिक युगात माणसाच्या भौतिक गरजा अमर्याद वाढल्या असून जयप्रकाश नारायण यांच्या मते, नैतिक गुणधर्म व मानसिक भूमिका ही लोकशाहीमध्ये अत्यंतिक महत्वाची आहे. सत्याची चाड, हिंसापरावृत्ती, स्वतंत्रता प्रेम आणि अन्याय जुलमांचा प्रतिकार करण्याचे धारिष्ट्य, सहकार्य भावना, स्वहिताचा समन्वय व्यापक हिताशी घालण्याची तयारी, इतरांच्या मतांबद्दल आदर आणि सहिष्णता, मानवमात्राच्या माणसाची बरीचशी धडपड त्या गरजा भागविण्यासाठी असते. त्या कधीच पूर्ण, समाधानी होऊ शकत नाही, कारण त्याच्या गरजा वाढतच जातात. मानवी व्यवहारांमधील समतोल ढळून संपूर्ण आयुष्य भौतिक होऊन जाते, लोकशाहीसाठी असे होणे इष्ट नाही. आपण आज पश्चिमेकडील आदर्श स्वीकारला आहे. भौतिकवादाचा लोकशाहीशी कधीच मेळ बसू शकत नाही माणसाला जर खरोखर स्वातंत्र्याचा उपभोग घ्यायचा असेल आणि स्वयंशासनाचा अवलंब करायचा असेल तर, त्याला आपल्या गरजा स्वच्छने सीमित करणे आवश्यक आहे. आणखी अधिक या लोभाचे पर्यावसन आपापसातील संघर्ष, बळजबरी, लूट, युद्ध इत्यादींमध्ये होते. उत्पादनाची पद्धत ही कमालीची गुंतागुंतीची होऊन जाते, त्यामुळे लोकशाही जखडून जाते असे जयप्रकाश नारायण यांचे मत आहे. गरजा मर्यादित करणे लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. अतिराज्यवादाने लोकशाही राजवटी आज गुरफटलेल्या आहेत.

**३ संसदीय स्वराज्य –**

जयप्रकाश नारायण यांच्या मते, स्वातंत्र्यानंतर गांधीजींना 'संसदीय स्वराज्य' अपेक्षित होते. आम्ही संसदीय लोकशाहीचा स्वीकार व अंमल केला. गांधीजी ग्रामगणराज्य, ग्रामस्वराज्याचे विचार आधीपासूनच व्यक्त करीत होते. गांधींना वाटत होते की, भारत हा खेड्यांचा देश आहे. म्हणून स्वतंत्र भारताची व्यवस्था, यंत्रणा ग्राम आधारित असली पाहिजे. गांधीजींना संसदीय लोकशाही व्यवस्थेमध्ये केंद्रामध्ये आणि राज्यांमध्ये दोन्ही ठिकाणी प्रतिनिधींच्या हातामध्ये व्यवस्थेचे नियमन संचालन असेल, खेड्यांमध्ये व शहरांमध्ये सत्ता प्रत्यक्ष नागरिकांच्या हाती सोपविण्यात येईल ते एकत्रितपणे आपली व्यवस्था चालवतील अशा तऱ्हेच्या ग्रामीण घटक, पंचायती, ग्रामसभा व नगरांच्या नगरसभा त्यांना अपेक्षित होत्या. दैनंदिन कामकाजामध्ये सरकारने हस्तक्षेप करू नये. अशा व्यवस्थेला गांधीजींनी 'संसदीय स्वराज्य' म्हटले होते, अशा प्रकारे स्वराज्यरुपी वर्तुळविस्तार हळूहळू वाढत जाईल. राज्य आणि राष्ट्रापर्यंत त्यांच्या सीमा पोहोचतील पूर्ण भारत हे गणराज्य असेल, अशी गांधींच्या अपेक्षा होती. संसदीय स्वराज्यामार्फत राजकीय पायाभूत आधार निर्माण होईल व सरकारची भूमिका क्रमशः कमीत कमी होत जाईल. सरकारची जागा स्वायत्त घटक व स्वावलंबी स्थानिक घटक घेत जातील अशी गांधीजींनी कल्पना केली होती अशा प्रकारे शेजार धर्मावर आधारित भागीदारीची लोकशाही क्रमशः विकसित होत जाईल आणि अशा क्रमाने लवकरच एक वेळ अशी येईल की राज्यातील विधानसभा व केंद्रातील संसद यात स्वायत्त व स्थानिक घटकांचे प्रतिनिधी जातील. तेथे आजच्या व्यवस्थेनुसार राजकीय पक्षांचे संघटीत परंतु विभाजित मतदारांनी निवडलेले प्रतिनिधी असणार नाहीत. जयप्रकाश नारायण या टप्प्याला ‘सिविल सोसायटी’ असे म्हणतात. हा नागरी समाज पूर्णतः लोकतांत्रिक असेल त्यानंतर पुढची पायरी म्हणजे ‘मॉरल सोसायटी’ म्हणजेच ‘नैतिक समाजाची’ असेल, यात प्रत्येक व्यक्तीवर त्याचे स्वतःचे राज्य असेल तेच अस्सल म्हणजे खरे स्वराज्य असेल. जेथे सरकारचा समाजाचा अंकुश नसेल दंडशक्तीची जागा क्रमशः स्वयं व आत्मशासन घेईल अशा प्रकारची व्यवस्था नैतिकदृष्ट्या विकसित व्यक्तीची असेल अशा अवस्थेत मनुष्याला पोहोचण्यासाठी विकासाचे अनेक टप्पे पार पाडावे लागतील. गांधींना व मार्क्स यांना शासनमुक्त समाजाची जी कल्पना अपेक्षित होती. ती अवस्था म्हणजेच ‘नैतिक शासन’ जिथे सरकारच्या दंडशक्तीची गरज भासणार नाही, असे जयप्रकाश नारायण स्पष्ट करतात.

**४ विकेंद्रीत राजकीय व्यवस्था-**

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये काँग्रेसने भारताचे आर्थिक, राजकीय व्यवस्था कशी असावी? यासंदर्भात पाश्चिमात्य विकसित प्रारूप म्हणजेच राष्ट्र राज्य, उदार लोकशाहीचे अनुकरण केले होते. तसेच समाजवादी विचारकांना देखील भारतीय राज्यात समाजवादी व्यवस्था स्थापन करावी त्यासाठी राज्याच्या हातात आर्थिक व राजकीय शक्तीचे केंद्रीकरण झाले तरी, त्या संदर्भात त्यांची हरकत नव्हती. त्यामुळे समाजवाद, लोकशाही समाजवाद देखील राज्य केंद्रितच होता. या महत्त्वपूर्ण मुद्द्यामुळे जयप्रकाश नारायण लोकशाही समाजवाद सोडून सर्वोदयाकडे आकर्षित झाले. सर्वोदयामध्ये राज्य केंद्रित आर्थिक, राजकीय व्यवस्था अपेक्षित नाही. गांधींच्या चिंतनामध्ये राज्याचे स्थान गौण होते. गांधींच्या मते, राज्यशक्ती इतकी कमीत कमी होत जाईल की, शेवटी ती शून्य होईल. त्यांच्या चिंतनात व्यक्ति केंद्रभूत होती. व्यक्तिभोवती गाव, नगराची पंचायत अशी होऊन ती वर्तुळे वाढत जातील. त्यांनाच गांधीजींनी 'सामुद्रिक वर्तुळे' (ओशनिक सर्कल्स) म्हटले आहे. ज्यांच्या अंतर्गत आजचा जिल्हा, राज्य, देश एवढेच नव्हे तर जगाचाही अंतर्भाव होतो परंतु हे एका आदर्श स्थितीचे चित्र होते. गांधीजींनी भारतासमोर 'ग्रामगणराज्यांचा महासंघ' असे उद्दिष्ट ठेवले होते, त्याची पहिली पायरी 'संसदीय स्वराज्य' होते. विनोबांच्या भूदान चळवळीमध्ये जयप्रकाश नारायण यांना गांधीजींच्या विचारांची अंमलबजावणी अपेक्षित होती.

**५ प्रतिनिधिक लोकशाहीचा आधार हा भागीदारीही असावा-**

जयप्रकाश नारायण गांधीजींचा लोकशाहीविषयी विचारांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टिकोनातून असे स्पष्ट करतात की, आज लोकशाहीचे स्वरूप व मूल्य ही घसरलेले असून लोकशाहीच्या संरक्षणासाठी आपण दोन उद्दिष्टे अंमलात आणली पाहिजेत. संविधानात अमलात असलेली शुभ तत्वे अबाधीत रहावीत. मतदारांचा प्रतिनिधींवर अंकुश राहील तसेच प्रतिनिधी हे मतदारांना जबाबदार राहतील अशी व्यवस्था विकसित करणे व दुसरे उद्दिष्ट म्हणजे भागीदारी लोकशाहीमुळे लोकशाहीचा विकास होईल. लोकशाही केवळ प्रातिनिधिक बनून थांबता कामा नये तर प्रातिनिधिक लोकशाहीचा आधार हा भागीदारीही असावा राज्यव्यवस्थेचा संपूर्ण आधार भागीदारी लोकशाही बनावी. तसेच नागरिकांनी आपला स्व प्रकट करावा व सहकार शक्तीच्या बळावर राज्य करावे. प्रतिनिधित्वाची सत्ता मर्यादित असावी असे जयप्रकाश नारायण यांचे मत होते. (राममूर्ती, (२००२): १५८)

**६ प्रतिनिधींची निवड** –

राज्य व राष्ट्र पातळीवर प्रातिनिधिक लोकशाही असू शकेल. परंतु प्रतिनिधींची निवड ही खालच्या घटकांकडून (युनिट) झाली पाहिजे, अशी जयप्रकाश नारायण यांची भूमिका होती. अशा वेळेस उमेदवार कोणा तर्फे उभे केले जावेत, असा प्रश्न निर्माण होतो यावर जयप्रकाश नारायण यांच्या मते, परिवर्तनासाठी कार्यरत असणाऱ्या संघटनांनी एकत्रीत येऊन आपल्या मतदारसंघातील मतदार मंडळे बनवावीत व या मंडळांनी उमेदवार उभे करावेत, त्यांची निवड करावी. अशा मंडळांनी निवडणुका लढवाव्यात व त्यांनाच आपला उमेदवार माघारी बोलविण्याचा अधिकार असला पाहिजे. बिहार आंदोलनाच्या वेळीस अशी संघटना बनली होती. छात्र युवा संघर्ष समित्या बनल्या होत्या आणि जनता सरकारे ही अस्तित्वात आली होती. नंतर जयप्रकाशांनी लोकसमित्या स्थापन करण्याचे ठरवले. आजच्या परिस्थितीत घटनेने स्थापन केलेल्या पंचायत राज्याच्या संघटीत ग्रामसभांची निर्वाचन मंडळे प्रत्येक क्षेत्रात स्थापन केली जाऊ शकतात आणि त्या सर्व कामाची जबाबदारी निर्वाचन मंडळांवरती सोपवली जावी. जी कामे जयप्रकाश बिहार आंदोलनातील संघर्ष समितीकडे सोपवू इच्छित होते. पंचायती राज्याचे एकूण तीन घटक ग्रामपंचायत, गट समिती (ब्लॉक) व जिल्हा परिषद समिती यातील घटकांद्वारे भागीदारी लोकशाहीला बऱ्याच प्रमाणात पुढे नेता येईल व हे घटक संपूर्ण क्रांतीच्या कार्यक्रमाला पुढे नेतील, अशी जयप्रकाश नारायण यांची भूमिका होती. ग्रामसभांनी बनवलेली निर्वाचन मंडळे राज्य विधानसभेसाठी व लोकसभेसाठी आपले प्रतिनिधी थेट पाठवू शकतील, अशी जयप्रकाश नारायण यांची भूमिका होती. (आचार्य राममूर्ती, (२००२): १६२)

जयप्रकाश नारायण यांच्या मते, पंचायत निवडणुकीसाठी बहुमत व अल्पमताचा आधार घेतला जातो. या पद्धतीचा स्वीकार न करता पंचायती निवडणुकांमध्ये 'कॉन्सेशस्' सहमतीचे काम करावे, संयुक्त राष्ट्रसंघाच्या परिषदेत सर्व संमतीचा आधार घेतला जातो, राजकीय पक्ष आपल्या अंतर्गत निवडणुकींसाठी 'कॉन्सेशस्' सहमतीचा आधार घेतात. त्याप्रमाणे पंचायतींनी आपल्या निवडणुका सर्व संमतीने कराव्यात, लोकशिक्षणाच्या सहाय्याने या पद्धतीचा परस्पर निर्वाह करता येईल. प्रारंभीच्या काही अडचणी सोडल्या तर पंचायती राज्याला दलमुक्त व पक्षरहित लोकशाहीचा आधार बनवता येईल अशी त्यांची भूमिका होती.

जयप्रकाश नारायण यांच्या मते, ज्याप्रमाणे लोकशाही हिंसेशी आधारित राहू शकत नाही. त्याप्रमाणेच राजकीय व आर्थिक शक्तीच्या केंद्रीकरणावर लोकशाही आधारली जाऊ शकत नाही. राजकीय व आर्थिक विकेंद्रीकरण अशा लोकशाहीसाठी अनिवार्य ठरेल. मतदाराला आपल्या शेजारच्या जीवनाचे नियमन व संचलन स्वतः करता येऊ शकेल, स्थानिक घटक व्यवस्था निर्माण करण्यात याव्यात. मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी उत्पादनात स्वावलंबी व परस्परावलंबी बनल्यास केंद्र व राज्य सरकारची बरीच कामे कमी होतील, अशी त्यांची भूमिका होती. सत्तेचे केंद्रीकरण हेच निरंकुश व भ्रष्ट निष्क्रिय सत्ता होण्याचे मुख्य कारण आहे अशी त्यांची भूमिका होती.

**७ सत्तेची रचना-**

जयप्रकाश नारायण यांच्या मते, लोकशाहीच्या विकासात सत्तेची रचना हा मुख्य प्रश्न आहे. या प्रश्नाकडे फारच कमी लोक लक्ष देतात. भावी लोकशाहीच्या दृष्टीने या पैलूचा विचार करण्याची आवश्यक आहे. आजपर्यंत जो विचार करण्यात आला तो प्रतिनिधिक लोकशाहीच्या संदर्भात होता परंतु भागीदारी लोक असलेल्या लोकशाहीच्या संदर्भात नव्हता. गांधी त्या दृष्टिकोनातून विचार करतात व त्यांनी त्या संदर्भात ठोस व भरीव उपाय योजना देखील सुचवलेल्या आहेत. गांधी विचार परंपरेनुसार लोकशाहीत लोकशक्ती जागृत करण्याचे काम कार्यकर्त्यांचे व सेवकांचे आहे आणि सत्ता सांभाळण्याचे काम पक्ष व संघटनांचे आहे. पण सत्ता प्रत्यक्ष अमलात आणण्याचे काम खुद्द नागरिकांचे आहे. सारे जनतेचे आहे अशी ही सत्तेची तीन अंगे आहेत. जनता आपल्या हिताचा व सर्वांच्या हिताचा विचार करून काम करेल या रीतीने जनतेची दृष्टी सीमित असेल म्हणून सुधारण्याची प्रगती काहीशी मंद असेल.जे सत्तेवर असतील,ते राजशक्तीचा उपयोग ठराविक निर्णय घेतलेल्या उद्देशांसाठी करतील. लोकशक्ती व राज्यशक्ती या दोन्ही राजकीय शक्तीच असतील, पण सेवकांची शक्ती ही सत्तेच्या बाहेरची असेल आणि ती नैतिक शक्ती असेल. सेवकांची सत्ता संपत्तीच्या लोभापासून व सत्तेच्या भयापासून मुक्त असेल. तिची क्षितिजे व्यापक असतील, ही सत्ता तात्कालीक व सीमित हिताच्या वर उठून मूल्यांच्या रक्षणासाठी सशक्त आवाज उठवतील. अशा तऱ्हेने लोकशाहीत राजकीय व नैतिक, अशा दोन्ही शक्ती कार्यरत असतील राजकीय सत्तेवर नैतिक सत्तेचा अंकुश असेल, जो आजच्या संपूर्णतः अभाव दिसून येतो.

जयप्रकाश नारायण यांच्या मते, लोकशाहीमध्ये राजशक्तीशी सन्मानपूर्वक सहयोग असेल, ज्यामध्ये नागरिकांना विचार स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य असेल. जनतेच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याचे दायित्व असेल. ज्या लोकशाहीला सतत नैतिक मार्गदर्शन प्राप्त होत असेल. एवढेच नव्हे तर नैतिकतेचा अंकुश असेल अशी लोकशाही क्रांतिकारी स्वरूपाची ठरेल, असे त्यांचे मत होते. जयप्रकाश नारायण यांना लोकशाही ही बहुआयामी व अनेक पैलू असणारी लोकक्रांती अशाप्रकारे अपेक्षित होती. ज्यामध्ये शिक्षण, विधायकता, संघटना व संघर्ष यावर आधारलेली कामे त्यांना अपेक्षित होती.

जयप्रकाश नारायण यांच्या मते, आजपर्यंत जितक्या क्रांती झालेल्या आहेत त्या क्रांती घडून गेल्यानंतर राजशक्तीने त्या क्रांतीचा ताबा घेतला आहे. या राजशक्तीने क्रांतीचे उद्दिष्ट खंडित करून टाकले. लोकशाहीत जेव्हा लोकशक्ती ही परिवर्तनाची वाहक बनेल तेव्हा परिवर्तनाचा प्रवाह गतिशील राहील. राजशक्ती परिवर्तनाच्या मार्गात अशा वेळेस अडथळा ठरणार नाही, असे त्यांचे मत होते. लोकशाही ही क्रांतिकारी असावी, अशी जयप्रकाशाची दूरदृष्टी होती. संपूर्ण क्रांतीच्या योजनेमध्ये राजकीय पक्षांची भूमिका आपोआप गळून पडेल आणि परिवर्तनासाठी वेगळी संघटना तयार करण्याची आवश्यकता उरणार नाही. लोकशाहीच्या गतिशीलतेमुळे आपोआप उद्दिष्ट साध्य होतील.‘जनता सरकारे’ व ‘लोकसमित्यांची’ कल्पना यासाठी जयप्रकाश यांनी प्रस्तुत केली आहे.

**८ सहभागी लोकशाही : सामुदायिक लोकशाही-**

संसदीय लोकशाहीतील असमानता लक्षात आल्यानंतर जयप्रकाश नारायण यांनी लोकशाही मधील दोष निराकरण करण्यासाठी व लोकशाही संकल्पना अधिक विकसित करण्यासाठी सामुदायिक लोकशाहीची संकल्पना मांडली आहे. सामुदायिक लोकशाही अधिक स्वावलंबनावर आणि अधिक समृद्धीवर आधारलेली असेल. सामुदायिक लोकशाहीमध्ये ग्रामस्थांनी निर्माण केलेल्या सत्ता विभाजनाच्या तत्त्वावर आधारलेली अशी लोकशाही असेल. ज्यामध्ये सत्तेची जागा सेवाभिमुखतेने घेतलेली असेल आणि अस्पर्धात्मक, सहकारी तत्त्वावर आधारलेली असेल. तसेच अशा प्रकारची लोकशाही ही खालून तळापासून निर्माण झालेली असेल. जयप्रकाश नारायण यांनी लोकस्वराज्यामध्ये असे लिहिले आहे की, या देशातील जनतेला निवडणुकीत सहभागी होण्याची संधी मिळाली पण त्यांना लोकशाहीच्या अंमलबजावणीची काळजी नव्हती. त्या क्षणिक संपर्काविषयी ग्रामीण भागात ही सर्वसामान्य जनता म्हणताना ऐकू येते की, ‘स्वराज्य आले पण ते आमच्यापर्यंत पोहोचले नाही’. असाच प्रकार

इंग्रजांच्या राजवटीत ही अस्तित्वात होता. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जनतेचा कोणताही सहभाग नाही. तेथील सरकार जनतेला जबाबदार राहत नाही. जुन्या राजवटीप्रमाणे स्वराज्यविषयी भावना जनतेत जाणवत आहे, त्यामध्ये आपणास बदल करावा लागेल.

वाराणसी येथे अपक्ष विद्यार्थी सभेमध्ये जयप्रकाश नारायण सहभागी लोकशाहीची संकल्पना मांडताना म्हणतात, "विद्यार्थी आणि तरुणांना एकजूट करून देशातील सध्याच्या लोकशाही संस्था आणि प्रक्रिया यांचे संरक्षण करावे, गांधीजींच्या ग्रामराज्य संकल्पनेनुसार लोकांनी आपला कारभार आपणच चालवावा, सरकार चालवण्याच्या प्रक्रियेमध्ये लोकांनी अधिकाधिक सहभागी व्हावे, चालू प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये प्रतिनिधींवर सर्वकाही सोपवून मतदार निष्क्रिय बनतात, त्यामुळे लोकशाही धोक्यात येण्याचा संभव असतो. लोकांचा प्रत्यक्ष सहभाग अधिकाधिक असणारी लोकशाही ही खरीखुरी लोकशाही आहे. लोक जागृत झाले क्रियाशील झाले तरच त्यांचे प्रतिनिधी जागृत राहतील. सक्रिय बनतील, स्वार्थी किंवा भ्रष्टाचारी बनणार नाहीत. कर्तव्य भ्रष्ट व स्वार्थी प्रतिनिधींवर जागृत मतदानाचा सतत अंकुश राहिला पाहिजे. वेळप्रसंगी असे प्रतिनिधी परत बोलावण्याचा अधिकार मतदारांना असला पाहिजे." जयप्रकाश नारायण हे राजनीतिला लोकनितीमध्ये परिवर्तित करू इच्छित होते, मात्र त्यासाठी प्रत्यक्ष लोकशाही व्यवस्थेमध्ये नागरिकांनी सहभाग घेतला पाहिजे, असे मत ते नोंदवतात. (पाटगावकर, (१९७७): ६६)

**९ विकेंद्रित सहभाग आणि पंचायतराज :**

जयप्रकाश नारायण यांचा राजकीय क्षेत्र पुनर्बांधणीचा मार्ग 'विकेंद्रित सहभाग आणि पंचायतराज' यावर आधारलेला होती. डॉ. राम मनोहर लोहिया यांनी मांडलेल्या चौखंबा संकल्पनेचा विस्तार जयप्रकाश नारायण यांनी केला. जयप्रकाश नारायण यांच्या राजकीय सत्तेचा पाया खेडे होता आणि जिल्हा या घटकाचा अंतर्भाव स्थानिक शासनाच्या कार्यामध्ये करून त्यांनी विकेंद्रित विकास करण्याचा प्रयत्न केला. जयप्रकाश नारायण यांच्या विकेंद्रीकरणाच्या पाच पातळया आहेत. त्या म्हणजे खेडे, गट, जिल्हा, प्रांत, केंद्र. जयप्रकाश नारायण यांच्या राजकीय पुनर्बांधणीच्या योजनेत 'पंचायती राज' किंवा 'तळापासून स्वराज्य' पद्धतीचे पुनरुज्जीवन आणि सशक्तीकरण यावर अधिक भर होता.

पंचायत राज यातील सर्वात तळातील घटक 'ग्रामसभा' हा होय. ग्रामसभेमध्ये गावातील सर्व प्रौढ यांचा सहभाग अपेक्षित मानला. जयप्रकाश नारायण यांच्या मते, पहिल्यांदा ग्रामसभेच्या रूपात ग्रामसभेने साधारणपणे बहुमताने पाच किंवा अधिक सभासदांचे कार्यकारी मंडळ म्हणून ग्रामपंचायत निवडावी. दैनंदिन कामकाजाची काळजी या पंचाच्या मार्फत घेण्यात येईल. ग्रामसभेने तळाच्या लोकशाहीचा कणा म्हणून काम करणे, जयप्रकाश नारायण यांना अपेक्षित होते. पंचायत राज्यांमधल्या पातळीवरचे मंडळ पंचायत समिती म्हणून ओळखावे. निर्वाचित सभासदांच्या प्रतिनिधींच्या पंचायत समितीचे कार्य ग्रामसभेच्या गटाच्या क्षेत्रात असेल तसेच समांतर कार्य असेल म्हणून पंचायत समितीकडे सुधारणा प्रकल्पांची घटना आणि प्रत्यक्षीकरण यावर लक्ष केंद्रित ठेवून ग्रामसभांना मार्गदर्शन आणि त्यांचे समन्वय या जबाबदाऱ्या दिल्या जातील. शेवटी वरच्या टोकावर पंचायत समित्यांनी निवडून दिलेल्या सदस्यांची जिल्हा परिषद असेल. जिल्हा परिषदेचे कार्यक्षेत्र मुख्यत: पंचायत समिती यांनी सुरू केलेल्या व मंजूर केलेल्या प्रकल्पांचे एकत्रीकरण आणि सूक्ष्म समन्वय यावरच केंद्रित असेल. या तिन्ही पातळयांवरती लोकांना सहभागाचा आणि खऱ्या लोकशाहीचा आनंद लुटण्याचा अधिकार असेल असे जयप्रकाश नारायण स्पष्ट करतात.

**समग्र क्रांतीची संकल्पना-** जयप्रकाश नारायण यांनी लोकशाही प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टिकोनातून समग्र क्रांतीची संकल्पना मांडली. सुरुवातीच्या कालखंडामध्ये समग्र क्रांतीची संकल्पना कोणत्याही राजकीय पक्षाच्या विरोधात नव्हती तर ती लोकशाही प्रक्रियेमध्ये विशेषतः प्रतिनिधी लोकशाहीमध्ये जे दोष निर्माण झालेले आहेत ते दोष निराकरण करण्याच्या दृष्टिकोनातून ही संकल्पना मांडली होती. सदर संशोधन पेपरच्या मर्यादांमुळे संपूर्ण

क्रांतीच्या संदर्भात या ठिकाणी मांडणी पूर्णपणे करता येत नाही. त्यातील ठळक मुद्द्यांचा व विचार या ठिकाणी चर्चिले जाणार आहेत.

जयप्रकाश नारायण यांची संपूर्ण क्रांती ही अहिंसेवरती आधारलेली होती. संपूर्ण क्रांतीच्या संदर्भात सैद्धांतिक स्वरूपाची मांडणी केलेली नाही. संपूर्ण क्रांती ही मानवाच्या संपूर्ण जीवनाच्या अंगाला स्पर्श करणारी अशी समग्र आणि सतत विकसित पावणारी अशी क्रांती जयप्रकाश नारायण यांना अपेक्षित होती. जयप्रकाश नारायण यांच्या मते, संपूर्ण क्रांती ही मर्यादित तात्पुरत्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संघर्ष नसून दूरगामी स्वरूपाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ही क्रांती अपेक्षित आहे. संपूर्ण क्रांतीद्वारे शोषण करणारी व्यवस्था नष्ट करून न्यायाची प्रतिष्ठापना करणारी व्यवस्था निर्माण करणे त्यांना अपेक्षित होते. ज्या व्यवस्थेमध्ये समाजातील सर्वात खालच्या थरातील लोकांच्या उद्धार होईल. सर्वात गरीब व शेतमजूर भूमिहीन, मुसलमान, हरिजन, आदिवासी हे सर्वांत तळाच्या थरातले लोक त्यांना प्रथम वर येण्याची संधी मिळेल अशा समाजामध्ये ज्या दृष्टता स्पृश्यस्पृश्यता जातीपातीचे झगडे, धार्मिक कलह आहे ते सर्व समाप्त होतील. सर्वांच्या अंतकरणात समाज हिताचा व्यापक विचार रोजच्या समाजातील अन्याय व शोषण यांचा अंत करणे. समाजात अमुलाग्र सामाजिक,आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक व नैतिक क्रांती घडवून आणणे त्याचबरोबर बाह्य समाज रचना बदलणे व पश्चिमात्य लोकशाहीच्या पिंजऱ्यातून भारतीय लोकशाहीस बाहेर काढण्यासाठी जयप्रकाश नारायण यांना संपूर्ण क्रांती अभिप्रेत होती. संपूर्ण क्रांतीमध्ये जयप्रकाश नारायण विज्ञान,लोकशाही, अध्यात्म या तिन्हीं विचाराची एकत्रीकरण अपेक्षित करतात. संपूर्ण क्रांतीतील अपेक्षित लोकशाहीचा पहिला व शेवटचा पाया हा नैतिकता असेल. सार्वजनिक जीवनामध्ये नैतिकतेला अनन्यसाधारण महत्त्व असेल अशी व्यवस्था जयप्रकाश नारायण यांना अपेक्षित होती. संपूर्ण क्रांतीमध्ये स्त्रियांना सन्मानाचे स्थान असेल, स्त्री स्वातंत्र्याच्या विचारांची जयप्रकाश नारायण मांडणी करतात. ग्राम पुनर्रचनेची मांडणी करतात. गांधी विचारांना केंद्रस्थानी ठेवून नव समाज निर्मिती जयप्रकाश अपेक्षित करतात. यासाठी जयप्रकाश पिरॅमिड समाज रचना विसर्जनेची कल्पना मांडतात. सागरी वर्तुळाच्या समाजाचे केंद्र व्यक्ती असेल व त्याच्या सभोवतालच्या विस्तृत लाटांद्वारे व्यक्ती समानता आनंदाने स्वातंत्र्याचा जास्तीत जास्त वापर करू शकेल अशी समाज रचना अभिप्रेत करतात.

**जयप्रकाश नारायण यांच्या लोकशाही विचारांचे योगदान-**

१) जयप्रकाश नारायण यांचा सहभागात्मक लोकशाही ही संकल्पना लोकशाही वरील श्रद्धा व निष्ठा कायम असल्याचे स्पष्ट करतात फक्त निवडून गेलेल्या प्रतिनिधींच्या वरती तो अविश्वास प्रकट करताना आपणास दिसतो. जे प्रतिनिधी जनतेला हवा असणारा न्याय विकास लोकशाहीची फळे प्रत्येकाच्या वाट्याला देऊ शकत नाहीत अशाबद्दलचा तो अविश्वास असल्याचे स्पष्ट होते.

२) सहभागात्मक लोकशाही ही संकल्पना लोकशाही वरील श्रद्धा व निष्ठा कायम असल्याचे व लोकशाही वरील विश्वास उडाला नसल्याचे द्योतक आहे. याचे दुसरे वैशिष्ट्य असे सांगता येईल की, हा विचार संवैधानिक चौकटीतला, अहिंसक विचार असून तो लोकशाही नष्ट न करता ती अधिक कृतीशील व अधिकाधिकांच्या नव्हे तर प्रत्येकाच्या कल्याणाची निर्माण करू इच्छितात.

३) जयप्रकाश नारायण हे सहभागात्मक लोकशाहीमध्ये प्रत्येकाचा सहभाग मागणारी सहभागशील लोकशाही निर्माण करू इच्छित होते. केवळ लोकशाही प्रक्रियेमध्ये प्रतिनिधिक निर्वाचितांचाच नव्हे तर सर्व प्रकारच्या लोकांचे म्हणणे ऐकले जावे आणि परस्पर विरोधी असले तरी सर्वच विचारांना अर्थपूर्ण बदलासाठी सामावून घेतले जावे असे म्हणणारा विचार होय. लोकशाहीसाठी अशासकीय असे लोक क्षेत्र सशक्त असणे आणि सर्व लोकांचा सहभाग वाढत असणे गरजेचे असल्याचे स्पष्ट करतात.

४) जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांती सहभागात्मक लोकशाहीच्या संकल्पनेमुळे तळपातळीवरती असलेल्या प्रचंड मोठ्या संख्येच्या श्रमिक, कष्टकरी, मजूर शेतमजूर, विस्थापित, दलित, अशिक्षित असा निवडणुकांपुरता

मर्यादित स्वरूपात असलेला समूह. जो समूह निर्धारण वंचित, संधी, निर्णय प्रक्रियेपासून वगळला गेलेला आहे.अशा राजकारणातील प्रत्यक्ष कृतिशील सहभाग कसा वाढवता येईल यासंदर्भात चिंतनास प्रारंभ झाला.

५) जयप्रकाश नारायण यांच्या सहभागात लोकशाहीच्या आंदोलनाची परिमिती म्हणजे पुढे भारतामध्ये सहभागात्मक लोकशाहीचा आग्रह धरणारी अनेक आंदोलने उदयास आली. त्यातील जनलोकपाल आंदोलन, नर्मदा बचाव आंदोलन, माहितीच्या अधिकाराची चळवळ, चिपको आंदोलन, आप्पिको आंदोलन, यांसारख्या आंदोलने उदयास आली.

६) जयप्रकाश नारायण यांच्या सहभागात्मक लोकशाहीमुळे लोकशाही संकल्पनेस अधिक व्यापकता आली. सहभागात्मक लोकशाहीमुळे जनतेच्या प्रश्नांच्या संदर्भात आंदोलने चळवळी उभा राहतात. लोकांची संघर्ष करण्याची मानसिकता निर्माण होते. त्यातूनच सामान्य लोकांची विकासासाठी व निर्णय प्रक्रियेतील प्रत्यक्ष सहभागाची भूमिका तयार होत असते. यातून लोकशाही प्रक्रिया पारदर्शक होण्यास मदत होते.

**जयप्रकाश नारायण यांच्या लोकशाही विचारांच्या मर्यादा-**

१) सहभागात्मक लोकशाही मधून निर्माण झालेल्या आंदोलनावरती नेतृत्वाचे शेवटपर्यंत नियंत्रण असणे गरजेचे असते. अन्यथा चुकीच्या मार्गाने आंदोलने जाऊ शकतात. व त्याचा फायदा अवाच्छंनीय घटक घेऊ शकतात. संपूर्ण क्रांती आंदोलनाने काही राजकीय पक्षांना फायदा झाला. तसेच अण्णा हजारे यांच्या जनलोकपाल आंदोलनाचा ही काही घटकांनी फायदा उचलला.

२) जयप्रकाश नारायण यांनी सहभागात्मक लोकशाहीला संपूर्ण क्रांतीचा कार्यक्रम दिला होता. मात्र आंदोलनातील सहभागी कार्यकर्ते तेवढ्या उंचीचे नसल्याकारणाने आंदोलन अपयशी ठरले. आजच्या कालखंडामध्ये सहभागी लोकशाहीची निर्मिती ही प्रातिनिधिक लोकशाहीने लोकांना आणलेल्या निराशेची परिमिती आहे. त्यामुळे सहभागात्मक लोकशाही ही प्रतिक्रियात्मक व प्रतिक्रियावादी स्वरूपाची असून तिला निश्चित असा कोणतीही विचार दिशा, राजकीय आर्थिक कार्यक्रम नसल्याचे आपणास स्पष्ट होते.

३) सहभागात्मक लोकशाही संदर्भात निर्माण होणारी आंदोलने ही वैयक्तिक राग लोभ, चीड व्यक्त करण्यासाठी व तेवढ्यापुरताच या आंदोलनांचा उपयोग होतो. नेतृत्वविहीन, निर्णायक भूमिकेचा अभाव, तसेच राजकीय व्यवस्थेबद्दल लोकांच्या मनामध्ये असलेली घृणास्पद भावना केवळ त्यातून व्यक्त होते. या आंदोलनामध्ये सहभागी निदर्शकांना कोणता बदल हवा आहे, निश्चित काय हवे असते. यासंदर्भात माहिती नसते. सोबत विचारशील अशी प्रक्रिया नसते. असेही काही विचारक या आंदोलनांवरती टीका करतात.

४) लोकशाही प्रक्रियेमध्ये प्रत्येक नागरिकाला सहभाग मिळणे ही अशक्यप्रयोग गोष्ट आहे. त्यामुळे प्रतिनिधिक लोकशाहीतील दोष दूर करण्यासाठी काही जनहिताचे सिद्धांत निर्माण होणे गरजेचे आहे. नव कायदे निर्मिती करून या दोषपूर्ण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. सहभागात्मक लोकशाहीच्या देखील निश्चित मर्यादा आहेत.

**संदर्भ ग्रंथ-**

१) पाटगावकर चंद्रकांत, प्रकाशयात्री जयप्रकाश (१९७७) अजब पुस्तकालय, कोल्हापूर.

२) शुक्ल सोमनाथ, विसावी शक्ति के राजनीतिक विचारक जयप्रकाश नारायण, आशिष प्रकाशन, कानपूर.

३) भोळे भा.ल.- आधुनिक भारतीय राजकीय विचार, (२००३) पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

४) नारायण जयप्रकाश, मेरी विचार यात्रा (२००३) सर्व सेवा संघ, प्रकाशन राजघाट, वाराणसी.

५) राममूर्ती आचार्य, जे.पी. की विरासत, (२००२) प्रकाशन पवणार, वर्धा.

६) मासिके- योजना (ऑगस्ट – २०१३) \ समाज प्रबोधन पत्रिका